# श्रमिक नारी संघाचे महिला गृह उद्योगात रुपांतर




श्रीमद् राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर परळी येथे श्रमिक नारी संघाच्या वतीने सुरु झालेल्या महिला गृह उद्योगाचे उद्‌घाटन प्रवीण मेहता यांच्या उपस्थितीत उद्योगपती बिपीन बावीसी व निशा बावीसी यांच्या हस्ते झाले. (छायाचित्र : शरद निकुंभ)

। पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यात परळी घोटावडे येथे दहा वर्षापूर्वी राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर प्रवीण मेहता यांच्या प्रेरणेने सुरु झाले.आज या व्यवसायाचे रुपांतर महिला गृह उद्योगात झाले. यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महिला गृह उद्योगाचे उद्‌घाटन पप्पाजींच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बिपीन बाविसी व निशा बाविसी यांच्या हस्ते करण्यात आले. यावळी श्रमिक नारी उद्योग समुहाच्या संचालिका सिमी थापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रुती शेठ, प्राणलाल शहा, बीनीन सावला या मान्यवरांसह आश्रमाचे अनेक मुमुक्षु यावेळी उपस्थित होते. महिला गृह उद्योगाच्या उत्पादनांचे ब्रॅन्ड नेम चाक्री असे ठेवण्यात आले आहे. सुमारे पन्नास महिला या उद्योगात श्रमिक नारी संघाच्या वतीने काम करीत आहेत. ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना काम शिकवून त्यांना रोजगाराची संधी आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीचा प्रयत्न श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटरच्या माध्यमातून केला जात आहे. अत्यंत दुर्गम भाग असलेल्या या वाड्यापाड्यात आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने आश्रमामार्फत फिरता दवाखाना सुरु करण्यात आला होता. याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद बघता परळी येथे क्लिनिक उघडण्यात आले. यात मुंबईतील नामांकित डॉक्टर विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम करीत आहेत. तालुक्यात सर्व सोयींनी युक्त असे मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमातर्फे सुरु करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी डॉ. हरेश ग्रोशर यांनी दिली.